जा.क्र./नसका/स्थायी/**CR-65**/२०१४.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक :- २१.०६.२०१४

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**
**स्थायी समितीच्या सभेची सूचना**
**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण -२ मधील नियम क्र.३ (अ) अन्वये**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र ३ (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दि.२४.०६.२०१४ रोजी वेळ १२.०० वा.**नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

स्वाक्षरीत/-
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

स्वाक्षरीत/-
**सभापती,**
स्थायी समिती,
नांवाशमनपा, नांदेड.

**प्रति,**

______________________________

**श्री/श्रीमती**
सदस्य / सदस्या स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**कार्यक्रम पत्रिका**

**विषय क्र.१**

दि.१०.०१.२०१४, दि.०४.०२.२०१४ रोजी मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करणे बाबत.

**विषय क्र.२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित प्रभाग क्र. ३६ मध्ये विणकर वसाहत येथे मार्कण्डेय चौकाचे सुशोभिकरण करणेसाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वरिष्ठांच्या निर्देशा नुसार सदर काम दि. ०२.०२.२०१४ रोजी मार्कण्डेय जयंती असल्यामुळे जयंतीचे औचीत्य साधुन सदर काम करणे गरजेचे असल्यामुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन रु. १,४७,२५०/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. कामाची निकड, तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पद्धतीने अंदाजपत्रक दरावर **श्री. दिगंबर कदम नांदेड** या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आले असुन त्यास झालेला खर्च रु. १,४७,२५०/- यास कार्योत्तर प्रशासकीय व अर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित सिडको स्मशानभुमिची दुरुस्ती व टिन शेड बसविणेसाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वरिष्ठांच्या निर्देशा नुसार सदर काम करणे गरजेचे असल्यामुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन रु. ८,७२,३७१/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. कामाची निकड, तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पद्धतीने अंदाजपत्रक दरावर **शेख मोईजोद्दीन अहेमद नांदेड** या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आले असुन त्यास झालेला खर्च रु. ८,७२,३७१/- यास कार्योत्तर प्रशासकीय व अर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दित झोन क्रं ५ अंतर्गत प्रभाग क्रं ३७ मधील स्मशानभूमी मध्ये ०६ नग जुने टयूबूलार पोल उभारण्यात आले आहेत. सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम(विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. २०११-१२ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर मे.नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.४२६९०/- (अक्षरी रु.बेचाळिस हजार सहाशे नव्वद फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका

अधिनियम १९४९ च्या अनूसूची (ड) प्रकरण (५) कलम (२) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.५**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दित झोन क्रं ५ अंतर्गत प्रभाग क्रं ३९ (ब) मध्ये नविन ७० व्हॅट सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहेत. सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम(विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. २०११-१२ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर मे.नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.८९४७५/- (अक्षरी रु एकोननव्वद हजार चारशे पंचेहात्तर फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनूसूची (ड) प्रकरण (५) कलम (२) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.६**

विषय:- औशधी व सर्जिकल साहित्य खरेदी करणे बाबत.

संदर्भ:- १) पशुवैद्यकीय अधिकारी यांचे पत्र क्र.२१४५९ दिनांक ३० नोव्हेंबर २०१३

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड क व ड अन्वये.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय दवाखाना येथे श्वान निर्बिजीकरण व लसीकरण कार्यक्रम राबविण्यासाठी संदर्भ क्र.१ अन्वये निविदा दर करारावर मे. पराग एजन्सी नांदेड यांच्याकडून औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करण्यासाठी लागणारी रक्कम रू.१,४२,०००/- (अक्षरी रूपये एक लाख बेचाळीस हजार फक्त८ च्यारक्कमेस संदर्भ क्र.२ च्या अधिन राहून प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येते. यावर होणारा खर्च हा सालसन २०१३-१४ च्या म.न.पा. अंदाजपत्रकाच्यासंबंधीत लेखा शिर्षकातून करण्यात यावा.

**विषय क्र.७**

एन.आर.ए.पी. मलनिस्सारण पम्प हाऊस येथील कॅपेसीटर बँक दुरुस्त करणे आवययक असल्याने प्लॉन्ट मध्ये स्पार्कींग होऊन इंटरनल वायरींग जळाले आहे. व संपूण कॅपेसिटर चालू राहण्याकरीता ४+२ MCB सद्यस्थितीत ACB तातडीने दुरुस्त करणे आहे. ११ KV चे Supply चालू असतांना सुध्दा प्लॉट मध्ये सप्लाय बंद करून दुरुस्तीचे काम करता येई. सध्या ुरुस्तीचे काम करतांना ११ KV चे Supply चालू असतो. करीता डि.ओ. सेट बसविणे आवश्यक आहे. जेणेकरून दुरुस्ती चे काम तातडीने करता येईल. DSR २०११-१२ प्रमाणे व मनपा मंजूर केलेल्या दराप्रमाणे अंदाजित खर्च रू. २,१२,९०२ (अक्षरी दोन लक्ष बारा हजार नऊशे दोन फक्त) यास अदाई करण्यासाठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मानयता प्रदान करणेसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.८**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित बीएसयुपी योजने अंतर्गत डिपीआर-१ गोवर्धनघाट येथे घरकुल व अंतर्गतसेवा सुविधांची काम करण्यासाठी रू.४.७८ कोटीचया कामाची निविदा असुन मे. सन्मान कंस्ट्रक्शन, नांदेड यांना कामाचे आदेश देण्यात आले आहेत, त्यापैकी डिपीआर-१ मधुन २२४ घरकुलाची कामे प्रगतीपथावर आहेत. सदरील कामावर आतापर्यंत ५.१९ कोटी इतक्या खर्च झालेला आहे. परंतु डिपीआर-१ मध्ये आर्थिक तरतुद शिल्लक नाही, तसेच गोवर्धनघाट येथील उर्वरीत कामे सुरु करण्यापुवी काही तांत्रिक बाबीमुळे खालील प्रमाणे अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

१. हाय फ्लड लेवल मुळे त्याठिकाणी प्लिन्थ च्या उंची मध्ये वाढ झालेली आहे.
२. हाय फ्लड लेवलमुळे संरक्षण भिंतीवर काही भाग आरसीसी मध्ये व विटाचे बांधकामाचा काही भागाचे डिझाईन करावे लागले.
३. बिल्डींग प्लान नुसार त्या ठिकाणी स्ट्रक्चरल डिझाईन मध्ये बदल करावा लागला.
४. मुळे अंदाजपत्रकामध्ये काही बाबीचा समावेश नसल्याने अतिरिक्त बाबीचा समावेश करावा लागला.

वरील सर्व बाबीचा समावेश करून सुधरीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असल्याने ८.८५ कोटीचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदर प्रकल्पावर वाढीव आर्थिक तरतुद ४.०७ कोटी अपेक्षित आहे.

गोवर्धनघाट येथील बीएसयुपी योजने अंतर्गतच्या घरकुलाची व अंतर्गत सेवासुविधाची कामे पुर्ण करण्यासाठी वाढीव रक्कम रू ४.०७ कोटी सुिधारित डिपीआर-२ मधुन खर्च करण्याची मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.९**

नांदेड शहर पाणीपुरवठ्याच्या डंकिन येथील २७ द.ल.ली. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्रावर कोटीतीर्थ येथुन येणाऱ्या उधरण नलिकेस जोडणी करण्यात आलेली असुन या स्त्रोताद्वारे रॉवाटर जलशुध्दीकरण केंद्रावर घेण्यात येते. रॉवाटर नियंत्रीत करण्याकरिता इनलेट जवळ ६०० मी.मी. व्यासाच्या वॉल्व त्या जवळील ९० degree बेड मधुन प्रचंड प्रमाणात पाण्याची गळती होत आहे. या गळती मुळे कोटीतीर्थ पंप येथुन अनावश्यक जास्तीची पंपींग करावी लागत असल्यामुळे सदरची गळती दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

गळतीचा भाग हा नदीच्या काठावरील असल्यामुळे खुप प्रमाणात खचला होता. परिणामी पाईप लाईन निखळण्याचा घोका निर्माण झालेला होता. करिता ती गळती दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक M.G.P. D.S.R. प्रमाणे रू. १,३५,७८८/- तयार करण्यात

आले. सदरील काम त्वरेने करणे करिता मे. इंद्रजा कन्स्ट्रक्शन, नांदेड यांच्या कडुन करून घेण्यात आले. यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.१०**

विषय:- चलचित्रीकरण व छायाचित्रीकरणाचे देयक अदाई बाबत.
संदर्भ:-१. कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/७५७/२००६ दि.१९.०४.२००६
२. कार्यायीन आदेश क्र. नांवाशमनपा/४५०२/२००८ दि.१८.०८.२००८

वरील संदर्भिय विषयास अनुसरुन आदेशित करण्यात येते की, रसता रुंदीकरण, अतिक्रमाण व अनाधिकृत बांधकाम काढतांना व इतर कारणासाठी मे. हर्षल फोटो स्टुडीओ व व्हीडीओ शुटींग यांना मनपा क्षेत्रिय कार्यालयांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार व्हीडीओ शुटींग व फोटो काढण्याचे काम करुन घेतलेले आहे. व तसा अहवाल देयकासोबत जोडला आहे.

सदर देयकाचा कालावधी दि. ०२.०४.२००७ ते ०३.०३.२००९ पर्यंतचा असुन चलचित्रीकरण व छायाचित्रीकरण यांचे एकुन रू.१,९१,०४०/- अक्षरी (एकलाख एक्यानव हजार चाळीस रु. फक्त) च्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजूरी प्रदान करण्यात येते.सदर खर्च सालसन २०१३-१४ चे अंदाज पत्रकातील संबंधित शिर्षकातून करण्यात यावा.

**विषय क्र.११**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित मेगा टुरीझम सर्कीट योजनेअंतर्गत नंदीग्राम किल्ला पर्यटन स्थळाचा विकास करणे (टप्पा क्र.२)रू.२०७.२९लक्ष च्या कामासाठी निविदा सुचना क्र. ३०८७४/१४ दि.२६.०२.२०१४ दै. दिव्य मराठी/लोकपत्र या वर्तमान पत्रात दि. २८.०२.२०१४ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकुण ३ (तिन) निविदा प्राप्त झाल्या पात्र निविदा त्रीसदस्यीय समीती समोर दि.१५.०४.२०१४ रोजी उघडण्यात आले असता तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| १ | पृथ्वी कंन्स्ट्रक्शन कंपनी | ३.९७% जास्त दर |
| २ | निखीला कंन्स्ट्रक्शन | ६.७५% जास्त दर |
| ३ | साईनाथ जी. पद्दमवार | ५.८६% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **पृथ्वी कंन्स्ट्रक्शन कंपनी** यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९७ % जास्त दराची आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने **पृथ्वी कंन्स्ट्रक्शन कंपनी** यांना दर कमी करण्यासाठी वाटाघाटीसाठी दि.०५.०५.२०१४ पाचारण केले असता त्यांनी वाटाघाटी अंती सदर काम अंदाजपत्रक दरापेक्षा ३.९७% जास्त दर ऐवजी २% जास्त दराने करण्याची लेखी संमती दिली आहे. करीता सदर कामासाठी **पृथ्वी कंन्स्ट्रक्शन कंपनी** यांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा २% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.१२**

मालमत्ता कर वसुली साधारणतः माहे ऑगस्ट पासुन होत असते, परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका *अधिनियम* १९४९ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेस करात सुट व शास्ती लावण्याची तरतुद उपलब्ध असुन ज्या कालावधीत महापालिकेस इतर स्त्रोताचे पुरेसे उत्पन्न प्राप्त होत नाही, त्या कालावधीत सुट देऊन व थकीत रकमेवर शास्ती लावली तर मालमत्ता कर व अनुषंगीक कर वसुली इष्टांक पुर्ण होण्यास निश्चीतच मदतीचे ठरु शकते. त्यासाठी सन २०१४-२०१५ या वर्षात मालमत्ता करावर खालील कालावधी समोर दर्शविल्यानुसार मालमत्ताधारकांना कराचा भरणा केला तर सुट व कराचा भरणा नकेल्यास शास्ती लावण्यासाठी कार्यालयीन पत्र क्र. करवि/२८५४३/२०१४दि.०४.०२.२०१४ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. अ)

| अनु क्रं. | कालावधी | सन २०१४-१५ च्या मालमत्ता करात सुट | सन २०१४-१५ देय सर्व करावर शास्ती |
|---|---|---|---|
| १ | माहे एप्रिल, २०१४ ते जुन, २०१४ | पुर्ण वर्षाचा कर भरणा केला तर १० टक्के | थकीत रकमेवर दर महा २ टक्के शास्ती.रक्कम अदा करे पर्यत |
| २ | माहे जुलै, २०१४ तेसप्टेबर, २०१४ | पुर्ण वर्षाचा कर भरणा केला तर ७ टक्के | |
| ३ | माहे आक्टोबर, २०१४ ते डींसेबर, २०१४ | पुर्ण वर्षाचा कर भरणा केला तर ५ टक्के | प्रथम सहामाही देय रकमेवर दरमहा २ टक्के शास्ती. |
| ४ | माहे जानेवारी, २०१५ ते मार्च, २०१५ | ० | पुर्ण देय रकमेवर दरमहा २ टक्के शास्ती.रक्कम अदा करे पर्यत |

सादर केलेल्या प्रस्ताव मा. स्थायी समिती ठराव क्र. ११३२ दिनांक २८ /२ / २०१४ रोजी समंत केलेला आहे. परंतु महानगरपालिकेने नव्यानेच सुरु केलेल्या ऑनलाईन कर भरणा पध्दतीस प्रोत्साहन व ई-ऑफीस कार्य प्रणालीस सुरुवात करण्याच्या हेतुने खालील प्रमाणे मालमत्ता कर भरणा करणा-या मालमत्ता धारकास मालमत्ता करात सुट प्रस्तावित करण्यात येते.

*ब)*

| अनु क्रं. | कालावधी | बाब | सन २०१४-१५ च्या मालमत्ता करात सुट | सन २०१४-१५ देय सर्व करावर शास्ती |
|---|---|---|---|---|
| १ | माहे एप्रिल, २०१४ ते जुन, २०१४ | १) | पुर्ण वर्षाचा कर ऑनलाईन भरणा केल्यास ८% +२% = १०% | थकीत रकमेवर दर महा २ टक्के शास्ती,रक्कम़ अदा करे पर्यत |
| | | २) | पुर्ण वर्षाचा कर वसुली लिपीकाकडे (मॅन्युअली) भरणा केल्यास ८% | |
| २ | माहे जुलै, २०१४ ते सप्टेबर, २०१४ | १) | पुर्ण वर्षाचा कर ऑनलाईन भरणा केल्यास ५%+२%=७% टक्के | |
| | | २) | पुर्ण वर्षाचा कर वसुली लिपीकाकडे (मॅन्युअली) भरणा केल्यास ५% | |
| ३ | माहे आक्टोबर, २०१४ ते डींसेबर, २०१४ | १) | पुर्ण वर्षाचा कर ऑनलाईन भरणा केल्यास ३%+२%=५% टक्के | प्रथम सहामाही देय रकमेवर दरमहा २ टक्के शास्ती, रक्कम अदा करे पर्यत |
| | | २) | पुर्ण वर्षाचा कर वसुली लिपीकाकडे (मॅन्युअली) भरणा केल्यास ३% | |
| ४ | माहे जानेवारी, २०१५ ते मार्च, २०१५ | | निरंक | पुर्ण देय रक्कमेवर दरमहा २ टक्के शास्ती.रक्कम अदा करे पर्यत |

सदरील प्रस्ताव याच सभेत कायम करण्यात यावा.

**विषय क्र.१३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित प्रभाग क्र.३७ मध्ये कोठा रविनगर चौक ते लातूर रोड (पोलिस चौक) पर्यत डांबरी रस्ता करणे रु.२,९९,००,०००/-साठी ई-टेंडर सेल व्दारे निविदा सुचना क्र.३०९८०/१४ दि.२६.०२.२०१४ अन्वये पुण्यनगरी/उद्याचा मराठवाडा/प्रजावाणी नांदेड या वर्तमानपत्रात दि.२८.०२.२०१४ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकुण ३ (तिन) निविदा प्राप्त झाल्या पात्र निविदा त्रीसदस्यीय समीती समोर दि.२८.०४.२०१४ रोजी उघडण्यात आले असता तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| १ | आर.जे.बिल्डकॉन लि. | १३% जास्त दर |
| २ | गणेश एन्टंरप्रायजेस नांदेड | ११% जास्त दर |
| ३ | शारदा कन्स्ट्रक्शन नांदेड | ९% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा शारदा कन्स्ट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त दराची आहे. शारदा कन्स्ट्रक्शन यांनी भरलेले दर जास्त वाटत असल्याने दर कमी करण्यासाठी संबंधितास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता वाटाघाटी अंती संबंधित कंत्राटदाराने सदर काम अंदाजपत्रक दरापेक्षा ९% जास्त दरऐवजी ८% जास्त दराने करण्याची लेखी संमती दिली परंतू ते ही दर जास्त वाटत असल्याने पुनश्च दि.२२.०५.२०१४ रोजी वाटाघाटीस पाचारण केले असता ८% जास्त दराऐवजी ७% जास्त दराने काम करण्याची लेखी संमती दिली आहे. करीता विषयांकित कामासाठी शारदा कन्स्ट्रक्शन नांदेड यांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा ९% जास्त दराऐवजी ७% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.१४**

काळेश्वर रॉ वाटर ची ९० mm व्यासाची मुख्य रायजींग मेनवती एस.जी.जी.एस.कॉलेज समोर, मुख्य हायवे रोडवर मोठी गळती अचानक झाल्यामूळे पाणी पुरवठा बंद झाला होता. तसेच विष्णूपूरी नजिक नृसिह मंदिराच्या बाजूला मोठया प्रमाणात गळती आढळून आली. या गळतीमूळे कमी दाबाने पाणी पुरवठा होत होता.

वरील दोन्ही गळतीचे कामे युध्द पातळीवर हाती घेवून आवश्यक व महत्वाचे असल्याने मे. इंद्रजा कन्सस्ट्रक्शन नांदेड यांचेकडून दुरुस्तीचे कामाचे अंदाजपत्रक MJP DSR प्रमाणे रु.२,५५,४५२/- तयार करण्यात आले त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर.

**विषय क्र.१५**

मनपा पाणी पुरवठा योजना BSUP योजने अंतर्गत झोन क्र.(३) अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत होणे करीता क्षेत्रिय कार्यालय झोन क्र.३ साठी उपअभियंता तथा कार्यकारी अभियंता यांनी खालील कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा च्या सालसन २०१३-१४ च्या जिल्हा दर सुचीनुसार तांत्रिक मान्यतेसह सादर केले असता त्यास BSUP विभागाकडून कार्यालयीन पत्र क्र.८४०२/१३ दि.२६.७.२०१३ व पत्र क्र.२४८३/१३ दि.१३.५.२०१३ व पत्र क्र.२४८४/१३ दि.१३.५.२०१३ अन्वये बिएसयुपी च्या डिपीआर-२ मधून खर्च करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय किंमत | कंत्राटदार |
|---|---|---|---|
| १ | नांवाशमनपा हद्दित झोन क्र.३ मधील प्र.क्र.२४ लक्ष्मीनगर भागात पा.पु. वितरण व्यवस्था बाबत | ९१७८२० लक्ष | पुजा कन्स्ट्रक्शन नांदेड |
| २ | नांवाशमनपा हद्दित झोन क्र.३ मधील प्र.क्र.२६ ब मध्ये प्रस्तावित क्रॉस कनेक्शन बाबत. | ३८३००० लक्ष | पंधे इन्फ्रा सोलापुर |
| २ | नांवाशमनपा हद्दित झोन क्र.३ मधील प्र.क्र.२४ मध्ये प्रस्तावित जलवाहिणीच्या क्रॉस कनेक्शन बाबत. | ९८७४८० लक्ष | पंधे इन्फ्रा सोलापुर |

वरील प्रमाणे उपरोक्त कामांना बिएसयुपी योजने अंतर्गत डिपीआर-२ मधून खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यात यावी. तसेच उपरोक्त कंत्राटदारांनी सदर कामे चालू दरसुचीनूसार केली असून त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस्तव प्रस्ताव सादर

**विषय क्र.१६**

नांवाशमनपा हद्दित जनता कॉलनी मध्ये श्री राजेमोरे यांचे घर ते श्री यशवंते यांचे घरापर्यत १५० एम.एम. व्यासाचे ड्रेनेज लाईन टाकणेकरीता कार्यालयीन पत्र क्र.१८७९/१३ hदि.०२.०५.२०१३ अन्वये कार्यकारी अभियंता, बिएसयुपी यांनी पत्र देवून सुध्दा पंधे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.सोलापूर यांनी काम पूर्ण केले नाही त्यानुसार स.सदस्य तथा अध्यक्ष जनता हाऊसिंग सोसायटी नांदेड यांचे निवेदन दि.२६.१२.२०१० व दि.१६.१.२०१३ मा.राज्यमंत्री तथा पालकमंत्री, नांदेड यांचे पत्र दि.०९.२.२०१३ अन्वये सदरील काम तातडीने हाती घेण्यासाठी सुचविल्यानुसार कार्यकारी अभियंता,बिएसयुपी यांनी सदर कामाचे अंदाजपत्रक रु.८,१०,१०१/चे तयार करुन सादर केले असून सदर कामाची तातडी व कामाची तातडी व निकड लक्षात घेता राज्स अंदाजपत्रक दरावर मे.इंद्रजा कन्स्ट्रक्शन, नांदेड यांचेकडून घेण्यात आले त्यावरील होणारा खर्च रु.८,१०,१०१/-(अक्षरी रु.आठ लक्ष दहा हजार एकशे एक फक्त) सविस्तर प्रकल्प अहवाल-II मधील आंबेडकरनगर कामाच्या निविदेतून कपात करुन मे.इंद्रजा कन्स्ट्रक्शन नांदेड यांचे नावे विना निविदा महानगरपालिका कायदा १९४९ चे प्रकरण ५ मधील कलम २ नुसार देवून संबंधिताचे देयक अदायी करणेसाठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर.

**विषय क्र.१७**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित BRGF योजने अंतर्गत असदवन भागात कामाचा वाव कमी करुन मंजुर किंमतीत काम पूर्ण करुन घेण्यात आले. त्यानंतर अल्प संख्या बहुलक्षेत्र विकास योजने अंतर्गत असदवन येथील गट क्र.२२ पर्यंत कब्रस्थानची संरक्षण भिंतीचे बांधकामासाठी ४५.०० मी. लांबीत प्रस्तावीत होती. अंदाजपत्रकात भिंतीला Plaster च्या बाबींचा समावेश नव्हता. त्यामुळे सदरील काम पुर्ण करत असताना स्थानिक नागरीकांनी त्या ठिकाणी जणाजा घेऊन जातांना त्यांना गावातूनच जणाजा घेऊन जावे लागत असल्यामुळे व कब्रस्तानमध्ये नमाज पडण्यासाठी जागा नसल्यमुळे रस्त्यावरच नमाज पडावे लागत असल्याने रस्त्यी रुंदी वाढवण्यासाठी विनंती केली. या विभागाचे कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहाणी करून वरिष्ठांच्या निर्देशानुसार सदर काम करणे गरजेचे असल्यामुळे आवश्यक बाबींचा समवेश करुन जास्त झालेल्या कामाचे रु.२,५४,६७०/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. एल. अँड एस. कंस्ट्रक्शन यांचे मर्फत करून घेण्यात आले असुन त्यास झालेला खर्च रु.२,५४,६७०/- साठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थि मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.१८**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित मोमीनपुरा सिध्दार्थनगर हा भाग झो क्र.३ मध्ये येत अुन बीएसयुपी येजने मध्ये डीपीआर क्र.२ मध्ये येत असुन सदर ठिकाणी आजपर्यंत १४८ घरकुलांचे कामे पुर्ण झालेली आहेत, तसेच बिल्डवेल कंस्ट्रक्शन यांचेकडून ८८ घरकुलाची प्रगती पथावर आहेत.

१. बिल्डवेल कंस्ट्रक्शन यांना स्थायी समितीच्या मान्येतेने ३९२.६२ लक्षाची कामे देण्यात आली आहेत.
२. पंधे कंस्ट्रक्शन यांना मोमीनपुरा व सिध्दार्थनगर ९१०.१२ लक्ष ची कामे निविदा काढुन देण्यात आली होती पण सद्यस्थिती मध्ये पंधे इन्फ्राकॉन्स यांनी काम बंद केली आहे.
३. मोमीनपुरा व सिध्दार्थनगर भागामध्ये स्कोप अंतिम केल्यानुसार Infrastrue १)Water supply २) Swer line ३) Storm Water drain ४) R.C.C. Road ५) Street light इत्यादी कामे करण्यासाठी रक्कम २७७.४६ लक्ष एवढा आवश्यक आहे.
४. आज पर्यंत सदर भागामध्ये झालेला खर्च खालील प्रमाणे आहे.

१. पंधे इन्फ्राकॉन्स प्रा.लि. ची खर्च रक्कम    २३०.०७ लक्ष
२. Buildwell Const. चा खर्च रक्कम    ३१२.१४ लक्ष
                                                    ५४२.२१ लक्ष

सदर भागामध्ये सध्या बिल्डवेल कन्स्ट्रक्शन यांचेकडुन घरकुलाची कामे प्रगती पथावर असल्यामुळे सदर भागाच्या सुविधाचा स्कोप अंतिम केल्यामुळे सदर भागातील कामे बिल्डवेल कन्स्ट्रक्शन यांचेकडून च करून घेणे सोईचे होईल.स्थायी समितीने बिल्डवेल कंस्ट्रक्शन यांना यापुर्वी ३९२.६२ लक्षाची घरकुल व मुलभूत सुविधाची कामे देण्यात आली आहेत, त्यामुळे सदर भागातील १)Water supply २) Swer line ३) Storm Water drain ४) R.C.C. Road ५) Street light इत्यादी २७७.४६ लक्ष किंमतीची मुलभूत सुविधा पुरविण्याची कामे बिल्डवेल कंस्ट्रक्शन यांना दिल्यास सुधारीत अंदाज पत्रकानुसार २७७.४६ लक्ष व पुर्वीची स्थायी समितीने दिलेली ३९२.६२ अशी एकुण ६७०.०८ लक्ष ची होत आहेत त्यास स्थायी समितीची मान्यता घेण्यसाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपूढे सादर.

**विषय क्र.१९**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडुन एनटीसी मिल परिसरात १८ मिटर रूंद डिपी रस्त्याचे काम नगरौथ्थान योजने अंतर्गत करण्यात आले असुन या रस्त्याच्या रूंदी करणामध्ये एकुण ६० मालमत्ता धारकांचे अतिक्रमाण काढण्यात आले. सदर अतिक्रमण धारकास एनटीसी मिलच्या मोकळया जागेत तात्पुरते पत्र्याचे शेड करुन बसविण्यात आले. त्यासाठी एनटीसी मित सोबत दि.१७.०१.२०१२ रोजी करारनामा करण्यात आला असुन तत्कालीन का. अभियंता यांनी प्रति महिना ३५४०२/- या प्रमाणे भाडे निश्चित केले होते. त्यानुसार दि.२०.०१.२०१२ ते २५.०९२०१३ पर्यंतचे एकुण भाडे रू.७१५८४४/- देणे होत आहे.सदर भाडे मनपा निधीतुन देण्यासाठी स्थायी समिती समोर मंजुरीसाठी सादर.

**विषय क्र.२०**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पाणीपुरवठा योजने अंतर्गत नागरी दलितवस्ती सुधार योजना २०१२-१३ या वित्तीय वर्षात मनपा हद्दीत प्रभाग क्र. १३ बसंता नगर भागात मलनिस्सारण व्यवस्था करणे करिता मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३६ दि. २४.१२.२०१२ व ठराव क्र. १९३ दि.२८.०१.२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता घेवुन सविस्तर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नांदेड यांना पाठविला असता जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दि.१३.०२.२०१४ च्या आदेशान्वये रू.८३.०० लक्ष रूपयास प्रशाकिय व आर्थिक मान्यता प्रदान करून शिल्लक रक्कम २.९७ लक्ष मनपा निधीतुन खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार रितसर निविदा प्रक्रिया करून निविदा मागविले असता पात्र तिन निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा मे. सोहेला कन्स्ट्रक्शन ॲन्ड स्टिल वर्क्स, नांदेड यांचे असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा ११ % जास्त दराने प्राप्त झाली. प्राप्त झालेले दर जास्त वाटत असल्याने संबंधित ठेकेदारास वाटाघाटीसाठी पत्र दिले असता ठेकेदारांनी ११ % जास्त दराऐवजी अंदाजपत्रक दरापेक्षा ९ % जास्त दराने काम करण्यास लेखी कळविले असता सदर दर सुध्दा जास्त वाटत असल्याने फेर वाटाघाटीसाठी दि.३०.०५.२०१४ रोजी आयुक्त यांच्या कक्षात ठेकेदारास वाटाघटीसाठी बोलाविले असता मे. सोहेल कन्स्ट्रक्शन ॲन्ड स्टिल वर्क्स, नांदेड यांनी सदर काम ९% जास्त दराऐवजी अंदाजपत्रक दरापेक्षा १% जास्त दराने काम करण्यास दि.०२.०६.२०१४ च्या पत्रानुसार लेखी संमती दिली आहे. करिता मे. सोहेल कन्स्ट्रक्शन ॲन्ड स्टिल वर्क्स, नांदेड यांची अंदाजपत्रके दरापेक्षा १ % जास्त दराची निविदा मान्य करून जास्तीचा होणारा खर्च मनपा निधितून करण्यास प्र. आ. मान्यता प्रदान करून दर मंजुर करण्यासाठी प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.२१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दित राष्ट्रविर महाराणा प्रतापसिंह यांचा आश्वारुढ पुतळा हॉटेल चंद्रलोक समोरील मोकळया जागेत उभारण्यात आला. पुतळयाचा लोकार्पण सोहळा दि. २२.०२.२०१४ रोजी माजी मुख्यमंत्री, मा. पालकमंत्री व इतर मान्यवराच्या उपस्थितीत संपन्न झाला. त्या सोहळयासाठी जवळपास ५००० ते ७००० नागरीक उपस्थित राहणार असल्याने त्यासाठी व्यासपीठ, मंडप, प्रकाश व्यवस्था, परीसर सुशोभिकरण, बॅराकेटींग, खुर्चा, ध्वनी क्षेपन व्यवस्था, जनरेटर इत्यादी करणे आवश्यक असल्याने श्री. सहयोग सेवा यांच्याकडून व्यवस्था करुन घेण्यात आली असून त्यासाठी रु. ४५००५३/- खर्च झाला.

कामाची निकड व तातडी पहाता उपरोक्त कार्यक्रमाची व्यवस्था रास्त पध्दतीने श्री. सहयोग सेवा नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात आले त्यास व कार्यक्रमासाठी झालेला खर्च रु. ४५००५३/- यास कार्योत्तर प्रशासकीय व अर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.२२**

श्री. गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम हे नांदेड शहरातील एकमेव क्रिकेट खेळाचे मैदान असून सदर मैदान आंतरराष्ट्रीय मानका प्रमाणे विकसीत करणे बाबत क्रिडा प्रेमीकडुन सातत्याने मागणी होत आहे. श्री. गुरु गोविंदसिंघजी क्रिडा संकुल हे शहराच्या मध्यभागी असून संकुला जवळच रेल्वे स्टेशन, विमानतळ तसेच शहरातील प्रमुख हॉटेल्स इत्यादी सुविधा अस्तित्त्वात आहेत. नांदेड शहर हे भारतातील सर्व प्रमुख शहराशी विमान सेवा तसेच रेल्वे सेवा याद्वारे जोडल्या गेले आहे. सदर स्टेडीयमचा आंतरराष्ट्रीय मानकाप्रमाणे विकास झाल्यास मैदानावर रणजी ट्रॉफी, आयपीएल इत्यादी राष्ट्रीय स्पर्धा खेळवल्या जाऊ शकतील पर्यायाने शहराच्या विकासास हातभार लावुन शहरात पर्यटन, शहर सौदर्यीकरण इत्यादी बाबींस चालना मिळणार आहे व याद्वारे नांदेड शहराचा

जागतीक पातळीवर लौकिक वाढणार आहे. सदर मैदानाचा विकास करण्यासाठी सालसन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकात श्री. गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणे या शिर्षाखाली रु. २.०० कोटीची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

मैदानाचा आंतरराष्ट्रीय मानकानूसार विकास करण्याच्या दृष्टीने Turnkey पध्दतीने निविदा काढण्यात आली असून या अंतर्गत मैदान विकासासाठी आवश्यक खोदकाम व भराव, मैदानावरील पाण्याचा निचरा करण्याच्या दृष्टीने ड्रेनेज व्यवस्था, हिरवळ लावणे, जल सिंचन व्यवस्था इत्यादी बाबींचे आराखडे तांत्रिक विवरण, योजना बध्द तांत्रिक लेखा (Design Calculation) मैदान देखभाल दुरुस्तीचे तंत्र यासह प्रकल्प अहवाल सादर करणे तसेच सदर मानकानूसार प्रत्यक्ष मैदान विकासाचे काम करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. उक्त काम करणे आवश्यक असल्याने सदर कामासाठी वर्तमान पत्रात निविदा सुचना No. NWCMC /PWD/Stadium/३११४६/२०१४ दि. २८.०२.२०१४ अन्वये दै. वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात येवून निविदा स्विकृती दि. ०५.०४.२०१४ अशी ठेवण्यात आली.

सदर कामासाठी एकुण तिन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदेचा लखोटा क्र. १ दि. १९.०४.२०१४ रोजी उघडण्यात आला. परंतु तिन निविदा धारकापैकी फक्त एकच निविदा धारक पात्र असल्याने सदर कामासाठी स्पर्धा झाली नसल्याने पुनःश्च दुसऱ्यांदा कार्यालयीन निविदा सुचना क्र. २४१६/२०१४ दि. ०९.०५.२०१४ अन्वये वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात येवून निविदा स्विकृती दि. २३.०५.२०१४ अशी ठेवण्यात आली.दुसऱ्यांदा निविदा सुचना प्रसिध्द केल्यानंतर फक्त एकच निविदा विक्री झाली असून सदर कामासाठी स्पर्धा झाली नसल्याने निविदा सुचनेस दि. ३०.०५.२०१४ पर्यत मुदतवाढ देण्यात येवून स्विकृती दि. ३१.०५.२०१४ अशी ठेवण्यात आली. सदर कामासाठी दोन वेळेस निविदा मागवून व एक वेळेस मुदतवाढ देवून प्रतिसाद मिळत नसल्याने आर.एस. ग्रीन मास्टर्स स्पोर्टस बैगलोर या एकच नावाने निविदा विक्री व स्विकृती झाल्याने निविदेचा लखोटा क्र. १ दि. ०७.०६.२०१४ रोजी त्रिसदस्यीय समीती समोर उघडण्यात आला. नियम व अटीनूसार सर्व कागदपत्राची तपासणी केली असता तपासणी अंती आर.एस. ग्रीन मास्टर्स बैगलोर हे पात्र ठरल्याने कंत्राटदाराचा लखोटा क्र. २ (Financial Bid) उघडण्यात आले.

आर.एस. ग्रीन मास्टर्स बैगलोर यांनी सदर काम करण्यासाठी रु. १,८२,७५,९५६/- असे एकत्रीत दर दिले असून ते दर जास्त वाटत असल्याने कंत्राटदारास दर कमी करणेसाठी दि. ०९.०५.२०१४ रोजी पाचारण केले असता काम करणेसाठी दिलेले दर रु. १,८२,७५,९५६/- ऐवजी रु. १,८०,००,०००/- या दराने काम करण्याची लेखी संमती दिली. या अंतर्गत अस्तित्त्वातील मैदानाचे खोदकाम करुन मानकानूसार खडी, वाळु, मातीचा थर देऊन मैदानाचे सपाटीकरण करणे, मैदानावरील पाण्याचा योग्य निचरा होण्याच्या दृष्टीने पाईप लाईन टाकणे, हिरवळ लावण्यासाठी जमिन तयार करणे, हिरवळ लावणे, जल सिंचनाची व्यवस्था करुन परिपुर्ण मैदान विकसीत करणे इत्यादी कामे हाती घेणार असून यासाठी लागणारे खडी, बारीक व जाड वाळु, लाल माती, नदी काठची माती इत्यादी साहीत्य महापालिकेस पुरवठा करावयाचे आहे. तसेच मैदानाभोवती आर.सि.सि. नालीचे बांधकाम व पाणी साठविण्यासाठी भुमिगत टाकीचे बांधकाम महापालिकेने करावयाचे आहे. करिता श्री. गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयमचे विकास करणेसाठी आर.एस. ग्रीन मास्टर स्पोर्टस बैगलोर यांनी संमती अंती दिलेले दर रु. १,८०,००,०००/- मंजुरीस्तव व सदर कामासाठी लागणारा खर्च १,८०,००,०००/- यास प्रशासकीय व आर्थीक मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.२३**

बीएसयुपी अंतर्गत नांदेड शहरातील विविध झोपडपट्टी भागातील घरकुलाचे बांधकाम व अंतर्गत मुलभूत सोई सुविधांच्या कामावर देखरेख करणेकरीता अपिल प्लॅनिंग कन्सल्टंन्सी, सुरत यांची पी.एम.सी. म्हणून दि.२५ एप्रिल २०१३ रोजी स्थायी समितीच्या बैठकीमध्ये ठराव क्र.१४ द्वारे नियुक्ती करण्यात आली होती. सदरची नियुक्ती ही केवळ एकाच वर्षाकरीता होती. कारण ठरावामध्ये तस स्पष्ट नमुद आहे. प्रतिमहा १७.६४ लक्ष प्रमाणे एका वर्षाच्या २.१० कोटी रू. च्या सल्लागार शुल्कासच तत्कालीन स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

याचाच अर्थ अपिल प्लॅनिंग कन्सल्टंसीचा एका वर्षाचा करार एप्रिल २०१४ मध्ये संपुष्टात आलेला आहे. अस्तित्वात असलेल्या एजन्सीकडूनच जर काम पुढे चालू ठेवाययचे असल्यास एक वर्षानंतर तसा करार नुतनीकरणाकरीता स्थायी समिती समोर आणावयास पाहिजे होता. अशी कार्यवाही आजपर्यंत या सभेसमोर आपणण्यात आलेली नाही. ठराव क्र.१४ दि.२५/०४/२०१३ नुसार अपील प्लॅनिंग कन्सल्टन्सी सोबतच्या कराराची वैधता संपुष्टात आलेली आहे. एजन्सीला करार संपुष्टात आल्यापासून पुढे काम करण्यास मज्जाव करण्यास प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**सुचकः**- श्री. अशोक उमरेकर **अनुमोदकः-** सौ. श्रध्दा चव्हाण

**विषय क्र.२४**
**प्रति,**
**मा. सभापती**
**स्थायी समिती,**
नां.वा.श.म.न.पा., नांदेड.

विषय: उप अभियंता या एकत्रित वेतनावरिल पदावरून सेवेतून कायम कमी केल्याच्या मा आयुक्त यांनी निर्गमित केलेल्या आदेशाविरूध्द अपील.

संदर्भ: कार्यालयीन आदेश क्र. नां.वा.श.म.न.पा./साप्रवि/आस्था-५/२९६१९/२०१४ दिनांक १३/०२/२०१४.

**अपिल**

महोदय,

मी संघरत्न गणपतराव सोनसळे, नां.वा.श.म.न.पा. कार्यालयीन आदेश क्र. नां.वा.श.म.न.पा. विप्रवि/आस्था-१/१२८९/०६ दि.१२.१२.२००६ या आदेशान्वये उप अभियंता या पदावर एकत्रित वेतनावर माझी नेमणूक करण्यात आलेली आहे. दिनांक १६.०१.२००७ रोजी मी उपअभियंता, गुंठेवारी विभाग प्रमुख म्हणून म.न.पा. च्या सेवेत रुजू झालो. उप अभियंता, म.न.पा. म्हणून मी सतत सात वर्ष नियमित व अखंडीत सेवा केलेली आहे. माझ्या नियुक्तीनंतर मी गुंठेवारी विभाग प्रमुख म्हणून गुंठेवारीचे प्रशिक्षण व माहित घेण्या ाठी पुणे आणि पिंपरी चिंचवड येथील महानगरपालिकेच्या गुंठेवारी विभागास भेट देवून गुंठेवारी विभागाची तेथील पध्दत व रित याचा अभ्यास करुन प्रशिक्षण घेऊन मी नांदेड म.न.पा.मध्ये खऱ्या अर्थाने गुंठेवारीस सुरुवात केली. मी स्वतः खाजगी सर्वेक्षणाच्या मदतीने म.न.पा. हद्दीतील गुंठेवारी वसाहतीचे सर्वेक्षण केले. तसेच गुंठेवारी या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी व नागरिकांना या कायद्याची माहिती देण्यासाठी नांदेड मधील सर्व वसाहतीत गुंठेवारी मेळावे आयोजित केले होते. त्यामुळे गुंठेवारीस नागरिकाकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला आणि माझ्या कार्यकाळात गुंठेवारी विभागास जवळपास १२ ते १३ कोटी रुपयाचा महसूल जमा करण्यात मी यशस्वी झालो. संदर्भिय आदेशान्वये गुंठेवारीच्या काही प्रकरणात अनियमितता झाल्यामुळे मला सेवेतून कायमचे कमी करण्यात आलेले आहे. माझ्यावर जे आरोप ठेवण्यात आलेले आहेत ते चुकीचे आणि माझ्यावर अन्याय करणारे आहे. म.न.पा. ने ज्या गुंठेवारी प्रकरणाच्या तांत्रिक दृष्टया तपासणी करणे, प्रकरणातील मालकी हक्काची कागदपत्रे, तसेच प्रस्तावित जागा मंजूर अथवा प्रारूप विकास योजनेत बाधीत होते किंवा कसे या सर्व बाबीची तपासणी करून मंजूरीची शिफारसे केले नसल्याबद्दल श्री अशेक लक्ष्मण गंजेवार यांच्या सात प्रकरणात मला सेवेतून कमी करण्यात आलेले आहे. वास्तविक पहाता गुंठेवारी विभागात प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे तांत्रीक दृष्टया तपासणी करून प्रकरणातील मालकी हक्काचे कागदपत्रे, ज्या जागेसाठी गुंठेवारी अपेक्षिलेले आहे ती जागा मंजूर अभिन्यासाची आहे किंवा नाही इत्यादि सर्व बाबीची तपासणी करण्यो जबाबदारी माझ्या कार्यालयातील कनिष्ठ कर्मचाऱ्यांची असून त्यांनी वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर सदरील प्रस्ताव माझ्याकडे सादर करावयास पाहीजे होते. तसेच या प्रस्तावातील कागदपत्रे खोटी असल्याचे माझ निदर्शनास आणून द्यायला पाहीजे होते. ही चूक माझ्या कर्यालयातील कर्मचाऱ्याकडून झालेली आहे.

सदरील प्रस्ताव आल्यानंतर प्रस्तावावर माझे शेरे लिहील्यानंतरच प्रस्ताव मा. उपायक्त विकास यांच्याकडे पुढी निर्णयासाठी मी पाठवित असे. परंतु श्री अशोक गंजेवार यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर मी कोणत्याही प्रकारचे शेरे लिहिलेले नाही. हे सर्व प्रस्ताव मा. उपायुक्त विकास यांच्याकडे पाठविण्यात आल्यानंतर या प्रस्तावावर मा. उपायुक्त विकास यांच्यासोबत चर्चा करण्याचे मी ठरविले होते. मात्र उपायुक्त विकास यांच्याकडे प्रस्ताव गेल्यानंतर सदरील प्रस्तावामध्ये खाडाखोड असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सर्व प्रस्ताव माझ्या सोबत चर्चा करून स्थगित करावयास पाहीजे होते. त्या ऐवजी माझ्या कनिष्ठ कर्मचाऱ्यावर कोणतहही कार्यवाही न करता फक्त मला च बाबतीत जबाबदार धरण्यात आलेले आहे. व त्याची जबर शिक्षा म्हणून मला सेवेतून कायमचे कमी करण्यात आलेले आहे. या सर्व प्रकरणात माझ्याकडून महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नसून यात कोणतही प्रकारचा अपहार झ ाालेला नाही. म्हणून माझ्यावर करण्यात आलेली कार्यवाही अन्यायकारक आहे.

मी महापालिकेत सेवेत असतांना मा. आयुक्त यांच्या आदेशावरून उपअभियंता साबा. विभागा झेन क्र.३ व ४ या विभा ाचा अतिरिक्त कार्यभार मी सांभाळलेला आहे. तसेच गरुता-गद्दी कार्यक्रमात विद्युत विभागात उप अभियंता म्हणून माझा कार्यभार सांभाळून या विभागात काम केलेले आहे. या शिवाय महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे लोकसभा, विधानसभा या सार्वत्रिक निवडणुकामध्ये मी क्षेत्रिय अधिकारी म्हणून उत्कृष्ट कामे केलेली आहेत तसेच २०११ च्या राष्टीय जनगणनेच्या कामात मी मास्टर ट्रेनर म्णून कामगिरी केलेली आहे. म.न.पा. आयुक्तांनी या कार्याबद्दल मला प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आलेले आहे. म.न.पा. २०१३ च्या निवडणुकामध्ये मी. इ.व्ही.एम. मशीन व्यवस्थापक व प्रशिक्षक म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल मला प्रमाणत्र देवून मा. आयुक्त यांनी गौरव केलेला आहे.वरील सर्व बाबी लक्षात घेता मा. अध्यक्ष स्थायी समिती म.न.पा. नांदेड यांना विनंती करण्यात येते की, माझ या वयास ४२ वर्ष पूर्ण झालेले असल्यामुळे शासकिय सेवेतील वयोमर्यादेची अट मी ओलांडली आहे त्यामुळे मला भविष्यात सरकारी नोकरी मिळू शकत नाही. माझ्या कुटुंबात मला दोन लहान लहान मुली आहेत तसेच माझी पत्नी कुठेही नोकरी करीत नाही माझ्या सोबत माझे वयोवृध्द आई वडील राहात असल्यामुळे त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी माझ्यावर आहे माझे वडील म्लातारपणामुळे सतत आजारी पउत असतात त्यांच्यावर ाहेणाऱ्या औषधेपचारची जबाबदारी सुध्दा माझ्यावर आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) मधील तरतुदीनुसार मला सेवेतून कायमस्वरूपी कमी केलेले आहे. परंतु यापूर्वी मी उप

अभियंता या पदावरील नियुक्ती झाल्यापासू महापालिकेने माझी सेवा कधीही खंडीत केलेली नसून माझी एकंदर सात वर्ष नियमित व अखंडीत सेवा झालेली आहे. आजपर्यंत माझ्यावर झालेल्या सेवाकालावधीत माहपालिकेने मला नियमित करावयास पाहिजे होते तसे न केल्यामुळे माझ्यावर अन्याय झालेला आहे. मुंबई प्रातिक अधिनियम ५६ (४) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्तांची निकट वरिष्ठ प्राधिकरण स्थायी समिती आहे. त्यानुसार मा. आयुक्त यांनी निर्गमित केलेल्या माझ्या आदेशाविरूध्द हे अपील दाखल करण्यात येत आहे. माझ्या अपीलाचा योग्य तो विचार करून माझे अपील मान्य करण्यात यावे. तसेच मा. आयुक्त म.न.पा. नांदेड यांनी मला सेवेतून कमी करण्यात आलेला आदेश रद्द करून मला सेवेत पुर्नस्थापीत करावे व माझे उध्वस्त होणारे आयुष्य वाचवावे हि विनंती.

**अपिलार्थी,**
स्वाक्षरीत/-
**संघरत्न गणपतराव सोनसळे**
माजी उपअभियंता,नांवाशमनपा, नांदेड.

**विषय क्र.२५**
**प्रति,**
**मा. सभापती**
**स्थायी समिती,**
नां.वा.श.म.न.पा., नांदेड.

विषयः- निलंबन प्रकरणी लावण्यात आलेली शास्ती माफ करणे बाबत.
संदर्भः- १. मा. आयुक्त महानगरपालिका नांदेड यांचे कडे केलेला अपिल अर्ज दि.१६.१०.२०१२
२. मा. आयुक्त महानगरपालिका नांदेड यांचे अपिल निकाली पत्र दि.१४.०३.२०१४

**<u>अपिल</u>**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन अर्ज करण्यात येते की, मला कोणतीही पुर्व सुचना अथवा नोटीस न देत कार्यालयीन कामात निष्काळजीपणा केल्याबाबत दोन दोषारोप मी अमान्य केल्यामुळे माझ्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करुन चौकशीच्या अधिन राहून मला कामावर पुनःस्थापित करण्यात आले. चौकशी अधिकारी यांनी माझ्या विरुध्द चौकशी आरंभ करुन सादरकर्ता अधिकारी व साक्षीदार यांच्या साक्षी नोंदविल्या तद्नंतर माझी साक्ष झाल्यानंतर चौकशी अधिकारी यांनी त्यांचा चौकशी अहवाल कार्यालयात सादर केला. चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार कार्यालयाने मला माझ्या विरुध्द दोषारोप क्र.२ हे अंशतः सिध्द होत असल्याचा अहवाल प्राप्त झाला असल्याने माझा निलंबन कालावधी दि.२२.०९.२०११ ते ०२.१२.२०११ पर्यंतचा काळ हा निलंबन काळ समजण्यात येवून माझी एक वार्षीक वेतनवाढ एका वर्षासाठी गोठविण्यात येत असल्याने आदेश निर्गमित केले. वास्तविक पाहता चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची एक प्रत मला देऊन माझ्या विरुध्द सिध्द हेत असलेले दोषारोपाबाबत माझे स्पष्टीकरण मागविणे आवश्यक होते, परंतु कार्यालयाने तसे न करता एक तर्फी निर्णय देवून माझ्या विरुध्द अन्याय केलेला आहे. ज्यामुळे माझे आर्थिक नुकसान होऊन मनस्तब्ध झाल्यामुळे मी या निर्णया विरुध्द मा. आयुक्त मनपा नांदेड यांचेकडे दाद मागणेसाठी अर्ज सादर करुन लावण्यात आलेली शास्ती माफ करणे बाबत विनंती केली असता मा. आयुक्त महोदयांनी माझी समक्ष साक्ष घेऊन माझा अर्ज फेटाळून लावला.

करीता आपल्याकडे न्याय मिळावा म्हणुन मी खालील प्रमाणे संक्षिप्त निवेदन सादर करीत आहे.

कार्यालयीन आदेश जा.क्र./३१९७/ दि.२०.०८.२०११ रोजी जनगणनेचे मुळ काम सांभाळुन झोन क्र.६ येथे माझी बदली झालेली होती. व मी जनगणना विभागाचे अत्यंत महत्वाचे व प्राधान्याचे कामे करुन दि.०१.०९.२०११ ते निलंबन होईपर्यंत अनाधिकृत बांधकामाची यादी तयार करणे व नोटीस काढणे आणि तेथील शिपायामार्फत नोटीस तामील करणे हे नेमणूक केलेले लिपीकाचे काम आहे. त्यानुसार मी दाखल केलेल्या पगकरणावर झेन क्र.६ च्या लिपीकार्मात कार्यवाही होत होती. त्यानुसार दि.२२.०९.२०११ रोजी तत्कालीन मा. आयुक्त यांनी अनाधिकृत बांधकाम प्रकरणात यादीसह बैठकीस हजर राहणयास कळविलेले होते. त्यानुसार क्षेत्रिय कार्यालय क्र.६ चे लिपीकांनी मला अनाधिकृत बांधकामाची यादी तयार करुन दिली. व मी ती बैइकीस सादर केली पण तत्कालीन मा. आयुक्तांनी माझ्या विरुध्द क्षेत्रिय कार्यालय क्र.६ तर्फे कोणतीही निष्काळजीपणाची नोटीस नसतांना प्रथम निलंबीत केले व तद्नंतर क्षेत्रिय कार्यालयामार्फत दोषारोप सादर करण्यात आला. कारण मी सदर बैठकीत अनाधिकृत बांधकामाच्या यादीसोबत गोषवारा प्रत सादर केला नसल्यामुळे मला तात्काळ निलंबीत केले. जे की, गोष्वारा सादर करणेसाठी मला माहिती नव्हते.

यानुसार मी क्षेत्रिय कार्यालय क्र.६ चे अनाधिकृत बांधकामावर नियंत्रण करुन व अनाधिकृत बांधकामे बंद करुन केलेली कार्यवाहीची यादी बैठकीत दाखल केली होती. व यासोबत प्रथम कर्तव्याचे जनगणनाची कामे ही करणे अत्यंत आवश्यक असल्याने दोन्ही कामे हे मी वेळीच करत होतो. कारण सदर कामे करणे हे मला प्रथम प्राधन्याने बंधनकारक होते. यानुसार सदर चौकशीत मा. क्षेत्रिय अधिकारी यांनी माझ्या कामाची प्रशंसा केली व विहित नमुन्यात गोषवारा सादर करण्यास झेन मध्ये संगणक चालक नसल्याने

गोष्वारा यादी दाखल करता आली नाही. असे सांगितले. व सादरकर्ता अधिकारी यांनीही विहित नमुन्यात संगणक चालक नसल्याकारणाने माहिती दिली नाही. असे कळविले. पण मी सदर झोनमध्ये नविन रुजू झालेला असल्यामुळे मला कोणत्या विहित नमुन्यात गोषवारा सादर करावयाचा आहे तो प्राप्त झालेला नव्हता किंवा माहिती नव्हती. मा. आयुक्तांनी बोलविलेल्या बैठकीस जी आवश्यक माहिती होती ती मी बैठकीस सादर केली. व विहित नमुन्यात सादर करण्यात येणारी गोषवाराची माहितीही सादर करण्यासाठी कळविण्यात आले नव्हते, किंवा मी त्याठिकाणी रुजु झाल्यापासुन मला मला मनपा कार्यालयातून कोणत्या विहित नमुन्यात गोषवारा प्रत सादर करावयाची आहे ती माहिती प्राप्त झालेली नव्हती. सदर माहिती ही लिपीकामार्फत केस रजिस्टरवरुन तयार करण्यात येते त्यांनीच मला अनाधिकृत बांधकामाची यादी उपलब्ध करुन दिली होती. जे मी बैठकीत सादर केले. व माझ्या साक्षीत लिपीकाचीही साक्ष घेणे आवश्यक होते. करिता मा. सभापती साहबाना नम्र विनंती की, सदर प्रकरणात माझे कोणतेही दोष नसतांना मी फक्त विहित नमुन्यात गोषवारा सादर न केल्यामुळे माझ्यावर लावण्यात आलेली दोन्ही शास्ती रद्द करावी.

**आपला विश्वासू,**
**स्वाक्षरीत/-**
अशफाख अली खान,
इमारत निरिक्षक,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड.

स्वाक्षरीत/-
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

स्वाक्षरीत/-
**सभापती,**
स्थायी समिती,
नांवाशमनपा, नांदेड.